# इतिवृत्त

मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) / जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) / विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) या समित्यांची सभा घेण्यात आली. त्या सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव व कार्यालय | हुद्दा | ✓ उपस्थित X अनुपस्थित | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) | जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) | विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) |
| १ | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग. | अध्यक्ष | ✓ | ✓ | ✓ |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग | सदस्य | X | X | X |
| ३ | पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग (प्रतिनीधी) | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ४ | निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | सदस्य सचिव | ✓ | ✓ | ✓ |
| ५ | उप वनसंरक्षक, वन विभाग सावंतवाडी. | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ६ | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ७ | नगर रचनाकार सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ८ | सहा. मत्स्यव्यवसाय आयुक्त, सिंधुदुर्ग मालवण (प्रतिनीधी) | सदस्य | X | -- | X |
| ९ | डॉ.बबन इंगोले, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |
| १० | डॉ.पी.वेठमणी, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |
| ११ | उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मा.विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई. | सदस्य | X | -- | -- |
| १२ | उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १३ | उपविभागीय अधिकारी, कणकवली (प्रतिनीधी) | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १४ | उपविभागीय अधिकारी, मालवण | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १५ | मुख्याधिकारी, नगर परिषद, वेंगुर्ला | सदस्य | X | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण | सदस्य | X | -- | -- |
| १७ | मुख्याधिकारी, नगर पंचायत, जामसंडे-देवगड | | X | -- | -- |
| १८ | जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, सिंधुदुर्ग. प्रतिनीधी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १९ | प्रादेशिक बंदर अधिकारी, मांडवी बंदर, रत्नागिरी/वेंगुर्ला प्रतिनीधी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| २० | कृष्णनाथ भ. तांडेल. रा.सर्जेकोट मिर्याबांदा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| २१ | वसंत महादेव तांडेल. मु.पो.नवाबाग,ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| २२ | संजय प्रभाकर बांदेकर. मु.पो.आनंदवाडी देवगड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| २३ | घनःश्याम उर्फ निलेश विनायक सामंत. मु.पो.परुळे (मांजरडेवाडी), ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | ✓ | -- |
| २४ | मेघनाद गणपत धुरी. रा.दांडी मालवण,ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २५ | वैशाली विजय आरोंदेकर. मु.पो.आरोंदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २६ | ज्ञानेश्वर सुर्यकांत खवळे. मु.पो.तारामुंबरी,ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २८ | तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग | -- | ✓ | ✓ | ✓ |
| २९ | तहसिलदार सावंतवाडी | नोडल ऑफिसर | X | X | X |
| ३० | प्रोजेकट मॅनेजर UNDP मालवण | | ✓ | ✓ | ✓ |
| ३१ | गटविकास अधिकारी मालवण | | ✓ | ✓ | ✓ |
| ३२ | गटविकास अधिकारी वेंगुर्ला | | ✓ | ✓ | ✓ |
| ३३ | गटविकास अधिकारी देवगड | | ✓ | ✓ | ✓ |

प्रथम उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. उपस्थित अधिकारी यांचा आढावा घेतला असता, मुख्याधिकारी, मालवण, वेंगुर्ला व जामसंडे-देवगड हे उपस्थित राहिलेले नाही. अनुपस्थित राहिल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस काढण्याच्या सूचना देणेत आल्या.

MCZMA यांचेकडील तक्रारी अर्जाबाबत-

MCZMA यांचेकडून एकूण ३८ तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहे. सदर तक्रारी उपविभागीय अधिकारी अधिकारी, सावंतवाडी यांचेकडे एकूण २१ तक्रारी अर्ज आहेत. त्यापैकी २ अर्ज निकाली झालेले आहे. त्याबाबतचा अहवाल MCZMA कडे पाठविण्यात आलेला आहे. उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचेकडे १४ तक्रारी अर्ज प्राप्त आहेत. त्यापैकी ४ अर्ज निकाली झालेले आहेत. उपविभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडे एकूण ३ अर्ज प्राप्त असून निकाली काही नाही. उर्वरित शिल्लक प्रलंबित अर्जाबाबत आवश्यक ती चौकशी करुन निकाली करण्याच्या सूचना देणेत आल्या. जे तक्रारी अर्ज निकाली काढण्यात आलेले आहे. सदर प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयाकडे पाठविण्याच्या सूचना देणेत आल्या.

<u>उपविभागीय अधिकारी निहाय तक्रारींचा गोषवारा</u>

| अ.क्र. | उपविभाग | प्राप्त तक्रारी | निकाली तक्रारी | शिल्लक तक्रारी |
|---|---|---|---|---|
| १ | कणकवली | ३ | ० | ३ |
| २ | कुडाळ | १४ | ४ | १० |
| ३ | सावंतवाडी | २१ | २ | १९ |
| | एकूण | ३८ | ०६ | ३२ |

वरीलप्रमाणे तक्रारी अर्जाचे सभेमध्ये अर्जनिहाय वाचन करण्यात आले. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांनी सदर अर्जाची सद्यस्थितीबाबत माहिती दिली. उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी त्यांचेकडे काही मूळ तक्रारी अर्ज प्राप्त झाले नसल्याचे सांगितले. परंतु सदरचे अर्ज या कार्यालयाकडून वेळोवेळी पाठविण्यात आलेले असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सांगितले. तरी उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेकडे सदर अर्जाचा शोध घेऊन आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना देणेत आल्या. सदर प्रलंबित अर्जाची यादी MCZMA यांचेकडील माहे जुलै २०२३ च्या सभेच्या इतिवृत्तामध्ये आकडेवारी घेतलेली आहे. त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हयातील ३६ अर्ज प्रलंबित असल्याचे दाखविले आहे. सदर इतिवृत्तासोबत प्रलंबित अर्जाची यादी पाठविण्यात आलेली आहे.

ज्या तक्रारी इतर कायद्यांतर्गत अंतर्भुत आहेत (उदा. अनधिकृत वाळू उत्खनन) त्या निकाली काढण्यासाठी त्याबाबत MCZMA ला अहवाल सादर करणे व तक्रारीचे तपशिल पाठविण्याबाबत सूचना देणेत आल्या. सन २०१९ पासून प्रलंबित प्रकरणाबाबत संबंधित विभागांनी छाननी करुन अहवाल सादर करण्याचे सांगितले. पुढील महामध्ये अशा तक्रारीवर चर्चा करुन निर्णय घेऊन निकाली काढण्यात येईल.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र.टिपीएस-१२१८/४३४४/ प्र.क्र.२०९/१८/नवि-१२ दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ अन्वये रत्नागिरी - सिंधुदुर्ग प्रादेशिक योजना क्षेत्रातील नियोजन प्राधिकरण नसलेल्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्राकरीता खालील अटींच्या अधीन राहून संबंधित ग्रामपंचायतीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीना त्यांचे अधिकार क्षेत्रातील जमिनीवर प्रचलित नियमावलीनुसार बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. याबाबत सहायक संचालक, नगर रचना सिंधुदुर्ग यांचेशी चर्चा करणेत आली. मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी प्रलंबित बांधकाम अर्ज प्रकरणाबाबत माहिती विचारणा केली व शिल्लक प्रकरणे त्वरीत निकाली करण्यांच्या सूचना देणेत आल्या. जिल्हयातील चार नगरपंचायतचा विकास आराखडा मंजूर असून चार नगरपंचायतचा प्रस्तावित असल्याचे सहायक संचालक, नगररचना सिंधुदुर्ग यांनी सांगितले.

शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक एनएपी- २०२१/प्र.क्र.११८ /ज-१ अ दिनांक १३ एप्रिल २०२२ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता -१९६६ च्या कलम ४२ (ब), (क) व (ड) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, करावयाच्या कार्यवाहीबाबत क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ४२ (ब) ४२ (क) व ४२ (ड) समाविष्ट केल्यानंतर जमीन मालकांना पुर्वीच्या बिनशेती परवानगीसाठी लागणारे विविध विभागाचे नाहरकत दाखले, त्यामध्ये होणारा कालापव्यय कमी होवून जमीन मालकांनी अकृषिक आकार/ रुपांतरण कर इत्यादी रक्कम भरल्यानंतर त्यांना सनद देण्यासाठी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ४२ (ब), ४२ (क) व ४२ (ड) च्या सुलभ कार्यपध्दतीचा सर्व संबंधित जमीन मालकांनी लाभ घ्यावा, यासाठी प्रिंट मिडीया / इलेक्टॉनिक मिडीयाद्वारे जनतेस आवाहन करण्यासाठी संबंधित जमिन मालकांना शासनाचे योजनेचा फायदा होण्यासाठी व शासनाचा महसूल वाढण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल १९६६ मधील कलम ४२ (ब), ४२ (क) व ४२ (ड) या नियमान्वये केलेल्या सुधारणा Ease of Doing Business व शासनाच्या उत्पन्नाच्या अनुषंगाने महत्वाचे असल्याने सदर नियमाची तात्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी संपूर्ण राज्यात एकसारखी कार्यपध्दती होण्याच्या दृष्टीकोनातून सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना कार्यवाही करण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने चर्चा करणेत आली.

महाराष्ट्र कोष्टल झोन मॅनेजमेंट ॲथारिटी, मुंबई यांचेकडील दिनांक १८/१०/२०२३ रोजीच्या परिपत्रकावर चर्चा करणेत आली. त्यामध्ये २. As per para ७ (vi) of CRZ Notification, २०१९, "Only for self-dwelling units up to a total built up area of ३०० square meters, approval shall be accorded by the concerned local uthority, without the requirement of recommendations of concerned Coastal Zone Management Authority and such authorities shall, however, examine the proposal from the perspective of the Coastal Regulation Zone Notification before according approval." एकूण ३०० चौरस मीटरच्या बांधलेल्या क्षेत्रफळाच्या केवळ स्व-निवास घटकांसाठी, संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून, संबंधित कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीच्या शिफारशींची परवानगी न घेता मान्यता देणेचे आहे.

श्री.आनंद हुले, दांडी मालवण यांनी दिनांक ०९/०२/२०२४ रोजी दिलेला अर्ज संबंधित विभागाकडे पाठविण्याच्या सूचना देणेत आल्या. CRZ कायद्याचे उल्लंघन करुन केलेल्या बांधकामाबाबत प्रलंबित तक्रार अर्जाचे अर्जनिहाय अहवाल उपविभागीय अधिकारी सावंतवाडी /कणकवली / कुडाळ यांनी सादर करावयाचे आहे. कांदळवन व सीआरझेडची बैठक एकाचवेळी घेण्याचे ठरले. पुढील महाची बैठक दिनांक १५/०३/२०२४ रोजी घेण्याचे ठरले. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

क्र.डेस्क-८/मशा-५/सीआरझेड सभा/२०२४,
जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, दिनांक :- १२/०२/२०२४

(किशोर तावडे)
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

प्रत :- १) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी तथा सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
४) सर्व संबंधित सदस्य यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) तहसिलदार देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला

(किशोर तावडे)
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

## इतिवृत्त

मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 15/03/2024 रोजी सकाळी 12.00 वाजता जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) / जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) / विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) या समित्यांची सभा घेण्यात आली. त्या सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव व कार्यालय | हुद्दा | उपस्थित X अनुपस्थित | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) | जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) | विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) |
| १ | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग. | अध्यक्ष | ✓ | ✓ | ✓ |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ३ | पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग (प्रतिनोधी) | सदस्य | X | X | X |
| ४ | निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | सदस्य सचिव | ✓ | ✓ | ✓ |
| ५ | उप वनसंरक्षक, वन विभाग सावंतवाडी. | सदस्य | X | X | X |
| ६ | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य | X | X | X |
| ७ | नगर रचनाकार सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ८ | सहा. मत्स्यव्यवसाय आयुक्त, सिंधुदुर्ग मालवण (प्रतिनीधी) | सदस्य | X | -- | X |
| ९ | डॉ.बबन इंगोले, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |
| १० | डॉ.पी.वेठमणी, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |
| ११ | उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मा.विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई. | सदस्य | X | -- | -- |
| १२ | उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १३ | उपविभागीय अधिकारी, कणकवली | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १४ | उपविभागीय अधिकारी, कुडाळ/ मालवण | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १५ | मुख्याधिकारी, नगर परिषद, वेंगुर्ला | सदस्य | ✓ | -- | -- |
| १६ | मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण | सदस्य | ✓ | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | मुख्याधिकारी, नगर पंचायत, जामसंडे-देवगड | | ✓ | -- | -- |
| १८ | जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, सिंधुदुर्ग. प्रतिनीधी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १९ | प्रादेशिक बंदर अधिकारी, मांडवी बंदर, रत्नागिरी/वेंगुर्ला प्रतिनीधी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| २० | कृष्णनाथ भ. तांडेल. रा.सर्जेकोट मिर्याबांदा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| २१ | वसंत महादेव तांडेल. मु.पो.नवाबाग.ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | -- | -- |
| २२ | संजय प्रभाकर बांदेकर. मु.पो.आनंदवाडी देवगड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | -- | -- |
| २३ | घनःश्याम उर्फ निलेश विनायक सामंत. मु.पो.परुळे (मांजरडेवाडी), ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | ✓ | -- |
| २४ | मेघनाद गणपत धुरी. रा.दांडी मालवण,ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २५ | वैशाली विजय आरोंदेकर. मु.पो.आरोंदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २६ | ज्ञानेश्वर सुर्यकांत खवळे. मु.पो.तारामुंबरी,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २७ | तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग | -- | ✓ | ✓ | ✓ |
| २८ | तहसिलदार सावंतवाडी | नोडल ऑफिसर | ✓ | ✓ | ✓ |
| ९ | प्रोजेकट मॅनेजर UNDP मालवण | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ३० | गटविकास अधिकारी मालवण | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ३१ | गटविकास अधिकारी वेंगुर्ला | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| २ | गटविकास अधिकारी देवगड | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ३३ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प.सिंधुदुर्ग | -- | ✓ | ✓ | ✓ |
| ३४ | प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विभाग, सिंधुदुर्ग | -- | ✓ | ✓ | ✓ |
| ३५ | नायब तहसिलदार (महसूल) | -- | ✓ | ✓ | ✓ |

प्रथम उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. उपस्थित अधिकारी यांचा आढावा घेणेत आला. MCZMA यांचेकडील 42 तक्रारी अर्ज प्राप्त असल्याचे सांगण्यात आलेले.

MCZMA यांचेकडून एकूण 42 तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहे. उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांचेकडे एकूण 21 तक्रारी अर्ज आहेत. त्यापैकी 4 अर्ज निकाली झालेले आहेत व 17 प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले. उपविभागीय अधिकारी कुडाळ/मालवण यांचेकडे 17 तक्रारी अर्ज प्राप्त आहेत. त्यापैकी 4 अर्ज निकाली झालेले असून 13 अर्ज शिल्लक आहेत. उपविभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडे एकूण 4 अर्ज प्राप्त असून 1 अर्ज निकाली व 3 अर्ज शिल्लक असल्याचे सांगण्यात आले . उर्वरित शिल्लक प्रलंबित अर्जाबाबत आवश्यक ती चौकशी करुन निकाली करण्याच्या सूचना देणेत आल्या. जे तक्रारी अर्ज निकाली काढण्यात आलेले आहे. सदर प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयाकडे पाठविण्याच्या सूचना देणेत आल्या. प्राप्त निकाली व शिल्लक तक्रारीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**उपविभागीय अधिकारी निहाय तक्रारींचा गोषवारा**

| अ.क्र. | उपविभाग | प्राप्त तक्रारी | निकाली तक्रारी | शिल्लक तक्रारी |
|---|---|---|---|---|
| 1 | कणकवली | 4 | 1 | 3 |
| 2 | कुडाळ | 17 | 4 | 13 |
| 3 | सावंतवाडी | 21 | 4 | 17 |
| | **एकूण** | 42 | 09 | 33 |

वरीलप्रमाणे तक्रारी अर्जाचे सभेमध्ये अर्जनिहाय वाचन करण्यात आले. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांनी सदर अर्जाचे सद्यस्थितीबाबत माहिती दिली. उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी त्यांचेकडे काही मूळ तक्रारी अर्ज प्राप्त झाले नसल्याचे सांगितले. यावर निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सदर अर्जाचा शोध घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना देणेत आल्या.

प्राप्त झालेल्या तक्रारीचा विषयनिहाय गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | तक्रार क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | झाडतोड / कांदळवन तोड | 8, 10, 14, 17, 40 | 05 |
| 2 | विनापरवाना बांधकाम | 2, 4, 5, 7, 9, 12, 13, 15, 18, 19, 20, 23, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 34, 35, 36, 37, 42 | 24 |
| 3 | सीआरझेड मध्ये कचरा टाकणे | 24 | 01 |
| 4 | पाणी प्रदुषण | 00 | 00 |
| 5 | सीआरझेड उल्लंघन | 11, 22, 25 | 03 |
| 6 | इतर | 21, 33, 38, | 03 |
| 7 | खनिकर्म शाखेकडील | 1, 3, 6, 16, 39, 41 | 06 |
| | **एकूण** | | 42 |

श्री.आनंद हुले यांचे अर्ज प्रकरणी चर्चा करणेत आली. त्यावर उपविभागीय अधिकारी, मालवण यांनी कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी तात्काळ अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नगरपरिषद मालवण यांचेकडे जास्त तक्रारी अर्ज प्रलंबित आहेत. सदर प्रकरणी कार्यवाही करुन तात्काळ अहवाल सादर करण्याच्या सूचना देणेत आल्या.

महाराष्ट्र कोष्टल झोन मॅनेजमेंट ॲथारिटी, मुंबई यांचेकडील दिनांक 26/02/2024 रोजीच्या पत्रासोबत SOP (Standard Operating Procedure for Addressing CRZ Violations) प्राप्त झालेली आहे. त्यामध्ये तक्रारी अर्ज निकाली कशा पध्दतीने कराव्यात याबाबतची माहिती देण्यात आलेली आहे. सदरची SOP सर्वांना पाठविण्याचे सुचित केले. सदर SOP मधील उल्लंघनाचे प्रकार दिलेले आहे. त्यावर चर्चा करणेत आली.

खनिकर्म शाखा यांचेशी निगडीत असलेल्या तक्रारी अ.क्र.1, 3, 6, 16, 39, 41 अशा असून, याबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कार्यवाही करुन त्याबाबतचे अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्याच्या सूचना देणेत आल्या. खनिकर्म शाखेकडून सदर प्रकरणी तत्परतेने कार्यवाही करणेत यावी. याबाबत अशासकीय सदस्य श्री.सामंत यांनी सदर तक्रारी खनिकर्म शाखेकडे न पाठवता सीआरझेड कमिटीमार्फत चौकशी करणेत यावी, असे मत मांडले. त्यावर निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सदर तक्रारीवर खनिकर्म शाखेकडून कार्यवाही करण्यात यावी, खनिकर्म शाखा ही मा.जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त असल्याने गौणखनिज़, वाळू इत्यादीबाबत खनिकर्म शाखेकडून कार्यवाही करावी अशा सूचना देणेत आल्या.

तसेच श्री.संजय बांदेकर, अशासकीय सदस्य यांनी असे मत मांडले की, फक्त तक्रार अर्जावरच कार्यवाही केली जाते, परंतू त्याव्यतिरिक्त काही ठिकणी सीआरझेड चे उल्लंघन होत असते, अशा बाबतीत संबंधित यंत्रणाने नियमानुसार कार्यवाही करावी. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी यांनी DCZMC या समितीतील शासकीय सदस्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांना कार्यवाही करण्याच्या सूचना देणेत याव्यात, असे सांगितले.

गट विकास अधिकारी देवगड यांनी सीआरझेड मधील अनधिकृत बांधकाम कोणी काढायची, याबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यावर निवासी उपजिल्हाधिकारी यांनी मार्गदर्शन केले. सदर अनधिकृत बांधकाम हे स्थानिक नियोजन प्राधिकरण यांनीच काढणेचे आहे. नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-टीपीएस- १२१८/४३४४/प्र.क्र.२०९/१८/नवि-१२ दिनांक 28/11/2018 सोबतच्या अधिसूचनेनुसार संबंधित ग्रामपंचायतींना त्यांचे अधिकार क्षेत्रातील जमिनीवर प्रचलित नियमानुसार बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार राहतील असे आदेश देण्यात आलेले आहेत. बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीना देण्यात आलेले असल्यामुळे अनधिकृत बांधकाम काढण्याची जबाबदारी सुध्दा ग्रामपंचायतीची राहिल. तसेच अनधिकृत बांधकाम व CRZ कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता संबंधित यंत्रणेने घेणेची आहे.

उपविभागीय अधिकारी यांचेकडील प्रलंबित प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून सदरच्या तक्रारी वेळीच निकाली होतील असे पहावे व शिल्लक 33 तक्रारी निकाली केल्याचा अहवाल तक्रारनिहाय या कार्यालयाकडे सादर करावा.

निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

क्र.डेस्क-8/मशा-2/सीआरझेड सभा/3/2024,
जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, दिनांक :- 15/03/2024

(किशोर तावडे)
**जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग**

प्रत :- १) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी तथा सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
४) सर्व संबंधित सदस्य यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) तहसिलदार देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला

(किशोर तावडे)
**जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग**

# इतिवृत्त

मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०२४ रोजी सकाळी १.३० वाजता जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) / जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) / विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) या समित्यांची सभा घेण्यात आली. त्या सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव व कार्यालय | हुद्दा | ✓ उपस्थित X अनुपस्थित | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) | जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) | विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) |
| १ | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग. | अध्यक्ष | ✓ | ✓ | ✓ |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ३ | पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग (प्रतिनीधी) | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ४ | निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | सदस्य सचिव | ✓ | ✓ | ✓ |
| ५ | उप वनसंरक्षक, वन विभाग सावंतवाडी. | सदस्य | X | X | X |
| ६ | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ७ | नगर रचनाकार सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ८ | सहा. मत्स्यव्यवसाय आयुक्त, सिंधुदुर्ग मालवण (प्रतिनीधी) | सदस्य | X | -- | X |
| ९ | डॉ.बबन इंगोले, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |
| १० | डॉ.पी.वेठमणी, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मा.विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई. | सदस्य | X | -- | -- |
| १२ | उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १३ | उपविभागीय अधिकारी, कणकवली | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १४ | उपविभागीय अधिकारी, कुडाळ (प्रतिनिधी) | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| १५ | मुख्याधिकारी, नगर परिषद, वेंगुर्ला | सदस्य | X | -- | -- |
| १६ | मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण | सदस्य | X | -- | -- |
| १७ | मुख्याधिकारी, नगर पंचायत, जामसंडे-देवगड | | ✓ | -- | -- |
| १८ | जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, सिंधुदुर्ग. प्रतिनीधी | सदस्य | X | X | X |
| १९ | प्रादेशिक बंदर अधिकारी, मांडवी बंदर, रत्नागिरी/वेंगुर्ला प्रतिनीधी | सदस्य | ✓ | -- | -- |
| २० | कृष्णनाथ भ. तांडेल. रा.सर्जेकोट मिर्याबांदा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| २१ | वसंत महादेव तांडेल. मु.पो.नवाबाग,ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | -- | -- |
| २२ | संजय प्रभाकर बांदेकर. मु.पो.आनंदवाडी देवगड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | घनःश्याम उर्फ निलेश विनायक सामंत. मु.पो.परुळे, (मांजरडेवाडी), ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २४ | मेघनाद गणपत धुरी. रा.दांडी मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २५ | वैशाली विजय आरोंदेकर. मु.पो.आरोंदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २६ | ज्ञानेश्वर सुर्यकांत खवळे. मु.पो.तारामुंबरी,ता.देवगड,जि .सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २८ | तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग | -- | ✓ | ✓ | ✓ |
| २९ | तहसिलदार सावंतवाडी | नोडल ऑफिसर | X | X | X |
| ३० | प्रोजेकट मॅनेजर UNDP मालवण | | ✓ | ✓ | ✓ |
| ३१ | गटविकास अधिकारी मालवण | | ✓ | ✓ | ✓ |
| ३२ | गटविकास अधिकारी वेंगुर्ला | | X | X | X |
| 33 | गटविकास अधिकारी देवगड | | ✓ | ✓ | ✓ |
| 34 | तहसिलदार मालवण | | ✓ | ✓ | ✓ |
| 35 | तहसिलदार देवगड | | ✓ | ✓ | ✓ |
| 36 | तहसिलदार वेंगुर्ला | | ✓ | ✓ | ✓ |
| 37 | वनक्षेत्रपाल, कुडाळ | | ✓ | ✓ | ✓ |

प्रथम उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. उपस्थित अधिकारी यांचा आढावा घेतला असता, वरीलप्रमाणे अधिकारी उस्थितीत होते.

MCZMA यांचेकडून एकूण 43 तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहे. सदर तक्रारी उपविभागीय अधिकारी अधिकारी, सावंतवाडी यांचेकडे एकूण 22 तक्रारी अर्ज आहेत. त्यापैकी 4 अर्ज निकाली झालेले आहे. त्याबाबतचा अहवाल MCZMA कडे पाठविण्यात आलेला आहे. उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचेकडे 17 तक्रारी अर्ज प्राप्त आहेत. त्यापैकी 4 अर्ज निकाली झालेले

आहेत. उपविभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडे एकूण 4 अर्ज प्राप्त असून त्यापैकी 1 अर्ज निकाली झालेले आहे. उर्वरित शिल्लक प्रलंबित अर्जाबाबत आवश्यक ती चौकशी करुन निकाली करण्याच्या सूचना देणेत आल्या. जे तक्रारी अर्ज निकाली काढण्यात आलेले आहे. सदर प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयाकडे पाठविण्याच्या सूचना देणेत आल्या.

**<u>उपविभागीय अधिकारी निहाय तक्रारींचा गोषवारा</u>**

| अ.क्र. | उपविभाग | प्राप्त तक्रारी | निकाली तक्रारी | शिल्लक तक्रारी |
|---|---|---|---|---|
| 1 | कणकवली | 4 | 1 | 3 |
| 2 | कुडाळ | 17 | 4 | 13 |
| 3 | सावंतवाडी | 22 | 4 | 18 |
| | **एकूण** | 43 | 09 | 34 |

वरीलप्रमाणे तक्रारी अर्जाचे सभेमध्ये अर्जनिहाय वाचन करण्यात आले. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी सावंतवाडी / तहसिलदार वेंगुर्ला यांनी सदर अर्जाच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली. उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी त्यांचेकडे काही मूळ तक्रारी अर्ज प्राप्त झाले नसल्याचे सांगितले. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून MCZMA यांचेकडे मागणी करणेत आलेली होती. तथापि सदर अर्ज अजून प्राप्त झालेले नाही. याबाबत MCZMA यांचेकडे पाठपुरावा करुन अर्ज प्राप्त करुन घेणेसाठी उपविभागीय अधिकारी सावंतवाडी / तहसिलदार वेंगुर्ला यांना सूचना देणेत आल्या.

**शिल्लक 34 तक्रारीची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | बाब | प्रकरण क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | झाडतोड / कांदळवन तोड | 10, 40 | 02 |
| 2 | विनापरवाना बांधकाम | 2, 5, 7, 9, 13, 15, 18, 19, 20, 23, 28, 29, 30, 31, 32, 34, 36, 37, 42, 43 | 20 |
| 3 | सीआरझेड मध्ये कचरा टाकणे | -- | 00 |
| 4 | पाणी प्रदुषण | 00 | 00 |
| 5 | सीआरझेड उल्लंघन | 11, 22, 25 | 03 |
| 6 | इतर | 21, 33, 38, | 03 |
| 7 | खनिकर्म शाखेकडील | 1, 3, 6, 16, 39, 41 | 06 |
| | **एकूण** | | 34 |

जिल्हयातील एकूण 43 प्रकरणापैकी प्रलंबित असलेले 34 प्रकरणांचा प्रकरणनिहाय आढावा घेणेत आला. यामध्ये खनिकर्म शाखेकडे बरेच प्रकरणांमध्ये अहवाल सादर केल्याचे तहसिलदार वेंगुर्ला व उपविभागीय अधिकारी यांचेकडून सांगण्यात आले. सदर प्रकरणी खनिकर्म अधिकारी यांना सदरचे प्रकरण तपासून कार्यवाही करण्याबाबत आदेश देणेत आले. त्याबाबतचे अहवाल महसूल शाखेकडे सादर करण्याबाबत सांगण्यात आले.

बरेच अर्ज नगरपालिका मालवण यांचेकडे प्रलंबित असल्याचे दिसून आले आहे. मुख्याधिकारी, नगरपालिका मालवण सदरच्या अर्ज प्रकरणी चौकशी करुन तात्काळ त्याबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांचेकडे सादर करणेच्या सूचना देणेत आल्या.

अनधिकृत बांधकामावर कार्यवाही कोणी करावी, याबाबत चर्चा करणेत आली. शासन, नगर विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक-टिपीएस- 1218/4344प्र.क्र.209/18/नवि-12 दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये संबंधित ग्रामपंचायतींना त्यांचे अधिकार क्षेत्रातील जमिनीवर प्रचलित नियमावलीनुसार बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहे. त्यामुळे अनधिकृत होणा-या बांधकामाबाबतची कार्यवाही पण ग्रामपंचायत यांनी करणेची आहे. याप्रमाणे चर्चा करणेत आली. ज्याठिकाणी नियोजन प्राधिकरण नसेल त्याठिकाणी उपविभागीय अधिकारी यांनी अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करणेची आहे. सदरची अधिसूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविणेत यावी. जेणेकरुन क्षेत्रीय अधिकारी यांना त्यांचेकडून पुरविणेत येतील.

CRZ कायद्याचे उल्लंघनबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी व कार्यवाही करताना सदर जागेवर जाऊन पाहणी करणेत यावी. तसेच पाहणी करताना सदर जागेचे/बांधकामाचे फोटो (रेखांश – अंक्षाशसह ) काढणेत यावे व तसा अहवाल सादर करण्यात यावा.

श्री.आनंद हुले यांचे एकूण 3 अर्ज प्रकरण प्रलंबित आहे. यावर मा.जिल्हाधिका महोदय यांनी तीन्ही अर्ज एकत्रित करुन सदरच्या अर्जाबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. लवकरात लवकर अर्ज निकाली काढून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्याच्या सूचना उपविभागीय अधिकारी कुडाळ यांना देणेत आल्या.

बरेच अर्ज प्रकरणी मंडळ अधिकारी यांचेकडे पाठविल्याचे अहवालामध्ये नमुद केलेले आहे. अर्ज प्रकरण पाठवून बराच कालावधी झाल्याचे दिसून येत आहे. तरी याबाबत सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांची बैठक घेऊन CRZ तक्रारीच्या अनुषंगाने आढावा घेणेत यावा.

निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

Signed by
Kishor Sadashiv Tawade
Date: 24-06-2024 12:29:04

(किशोर तावडे)
**जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग**

क्र.डेस्क-8/मशा-2/सीआरझेड सभा/6/2024,
जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, दिनांक :- 14/06/2024

प्रत :- १) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी तथा सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
४) सर्व संबंधित सदस्य यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) तहसिलदार देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला

(किशोर तावडे)
**जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग**

# इतिवृत्त

मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२/०७/२०२४ रोजी सकाळी १२.००० वाजता जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) / जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) / विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) या समित्यांची सभा घेण्यात आली. त्या सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव व कार्यालय | हुद्दा | ✓ उपस्थित X अनुपस्थित | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) | जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) | विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) |
| १ | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग. | अध्यक्ष | ✓ | ✓ | ✓ |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग | सदस्य | X | X | X |
| ३ | पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग (प्रतिनीधी) | सदस्य | ✓ | ---- | --- |
| ४ | निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | सदस्य सचिव | ✓ | ✓ | ✓ |
| ५ | उप वनसंरक्षक, वन विभाग सावंतवाडी. | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ६ | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| ७ | नगर रचनाकार सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | ✓ | -- |
| ८ | सहा. मत्स्यव्यवसाय आयुक्त, सिंधुदुर्ग मालवण (प्रतिनीधी) | सदस्य | X | -- | X |
| ९ | डॉ.बबन इंगोले, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |
| १० | डॉ.पी.वेठमणी, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मा.विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई. | सदस्य | X | -- | -- |
| १२ | उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी | सदस्य | ✓ | --- | --- |
| १३ | उपविभागीय अधिकारी, कणकवली | सदस्य | ✓ | --- | --- |
| १४ | उपविभागीय अधिकारी, कुडाळ | सदस्य | ✓ | --- | --- |
| १५ | मुख्याधिकारी, नगर परिषद, वेंगुर्ला | सदस्य | ✓ | --- | --- |
| १६ | मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण | सदस्य | ✓ | --- | --- |
| १७ | मुख्याधिकारी, नगर पंचायत, जामसंडे-देवगड | | ✓ | --- | --- |
| १८ | जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, सिंधुदुर्ग. प्रतिनीधी | सदस्य | X | X | X |
| १९ | प्रादेशिक बंदर अधिकारी, मांडवी बंदर, रत्नागिरी/वेंगुर्ला प्रतिनीधी | सदस्य | -- | -- | ✓ |
| २० | कृष्णनाथ भ. तांडेल. रा.सर्जेकोट मिर्याबांदा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| २१ | वसंत महादेव तांडेल. मु.पो.नवाबाग,ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| २२ | संजय प्रभाकर बांदेकर. मु.पो.आनंदवाडी देवगड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | घनःश्याम उर्फ निलेश विनायक सामंत. मु.पो.परुळे, (मांजरडेवाडी), ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २४ | मेघनाद गणपत धुरी. रा.दांडी मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २५ | वैशाली विजय आरोंदेकर. मु.पो.आरोंदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २६ | ज्ञानेश्वर सुर्यकांत खवळे. मु.पो.तारामुंबरी,ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| २८ | तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग | -- | ✓ | ✓ | ✓ |
| २९ | तहसिलदार सावंतवाडी | नोडल ऑफिसर | X | X | X |
| ३० | प्रोजेकट मॅनेजर UNDP मालवण | | ✓ | ✓ | ✓ |
| ३१ | गटविकास अधिकारी मालवण | | ✓ | ✓ | ✓ |
| ३२ | गटविकास अधिकारी वेंगुर्ला | | X | X | X |
| ३३ | गटविकास अधिकारी देवगड | | ✓ | ✓ | ✓ |
| ३४ | नायब तहसिलदार (महसूल) | | ✓ | ✓ | ✓ |

प्रथम उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. उपस्थित अधिकारी यांचा आढावा घेतला असता, वरीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

MCZMA यांचेकडून सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण 43 तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहे. त्यापैकी उपविभागीय अधिकारी अधिकारी, सावंतवाडी यांचेकडे एकूण 22 तक्रारी अर्ज आहेत. त्यापैकी 8 अर्ज निकाली झालेले आहे. त्याबाबतचा अहवाल MCZMA कडे पाठविण्यात आलेला आहे. उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचेकडे 17 तक्रारी अर्ज प्राप्त आहेत. त्यापैकी 6 अर्ज निकाली झालेले आहेत. उपविभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडे एकूण 4 अर्ज प्राप्त असून त्यापैकी 2 अर्ज निकाली झालेले आहे. उर्वरित शिल्लक प्रलंबित अर्जाबाबत आवश्यक ती चौकशी करुन

निकाली करण्याच्या सूचना देणेत आल्या. जे तक्रारी अर्ज निकाली काढण्यात आलेले आहे. सदर प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयाकडे पाठविण्याच्या सूचना देणेत आल्या.

**<u>उपविभागीय अधिकारी निहाय तक्रारींचा गोषवारा</u>**

| अ.क्र. | उपविभाग | प्राप्त तक्रारी | निकाली तक्रारी | शिल्लक तक्रारी |
|---|---|---|---|---|
| 1 | कणकवली | 4 | 2 | 2 |
| 2 | कुडाळ | 17 | 6 | 11 |
| 3 | सावंतवाडी | 22 | 8 | 14 |
| | **एकूण** | 43 | 16 | 27 |

वरीलप्रमाणे तक्रारी अर्जाचे सभेमध्ये अर्जनिहाय वाचन करण्यात आले. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी सावंतवाडी / कुडाळ / कणकवली प्रलंबित अर्जाच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली.

मागिल सभेमध्ये उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी त्यांचेकडे काही मूळ तक्रारी अर्ज प्राप्त झाले नसल्याचे सांगितले होते. त्यानुसार मा.MCZMA यांचेकडे पत्र पाठवून 8 अप्राप्त अर्जापैकी 5 अर्ज प्राप्त करुन घेणेत आलेले आहे. सदरचे अर्ज तात्काळ उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी व कुडाळ यांजकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याचे तहसिलदार (महसूल) यांनी सांगितले. उर्वरित शिल्लक 3 अर्ज मिळण्यासाठी पुन्हा पाठपुरावा करण्याच्या सूचना मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी दिल्या.

**शिल्लक 34 तक्रारीची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | बाब | प्रकरण क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | झाडतोड / कांदळवन तोड | 10, 40 | 02 |
| 2 | विनापरवाना बांधकाम | 2, 5, 7, 9, 13, 15, 18, 19, 20, 23, 28, 29, 30, 31, 32, 34, 36, 37, 42 | 19 |
| 3 | सीआरझेड मध्ये कचरा टाकणे | -- | 00 |
| 4 | पाणी प्रदुषण | -- | 00 |
| 5 | सीआरझेड उल्लंघन | 11, 22, 25 | 03 |
| 6 | इतर | 21, 33, 38, | 03 |
| 7 | खनिकर्म शाखेकडील | -- | 00 |
| | **एकूण** | | 27 |

जिल्हयातील एकूण 43 प्रकरणापैकी प्रलंबित असलेले 27 प्रकरणांचा आढावा घेणेत आला. मागिल सभेमध्ये दिलेल्या सूचनानुसार खनिकर्म शाखेकडील एकूण 6 तक्रारी अर्जाचा अहवाल प्राप्त झालेला आहे. सदरच्या तक्रारी ह्या निकाली करण्यात आलेल्या आहेत. तसेच श्री.दिलीप लक्ष्मण गिरप, नगराध्यक्ष वेंगुर्ला नगर पालिका यांचा अर्ज निकाली करण्यात आलेला आहे. असे एकूण 7 तक्रारी अर्ज निकाली करण्यात आलेले आहे. याबाबतचा अहवाल मा.अध्यक्ष, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी, पर्यावरण व हवामान बदल विभाग, 15 वा मजला, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई-400032 यांचेकडील दिनांक 03/07/2024 रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे.

उर्वरित 27 तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावर तहसिलदार / मुख्याधिकारी / गटविकास अधिकारी यांचा आढावा घेणेत यावा व आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करणेत यावी, अशा सूचना मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी दिल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.जिल्हाधिकारी यांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

क्र.डेस्क-8/मशा-2/सीआरझेड सभा/7/2024,
जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, दिनांक :- 12/07/2024

(किशोर तावडे)
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग
तथा अध्यक्ष, (DCZMC) जिल्हास्तरीय
सागरी किनारा क्षेत्र संनियंत्रण समिती

प्रत :- १) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी तथा सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
४) सर्व संबंधित सदस्य यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) तहसिलदार देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला

# इतिवृत्त

मा. अध्यक्ष, तथा जिल्हास्तरीय सागरी किनारा क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) तथा जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३/०९/२०२४ रोजी सकाळी १.३० वाजता जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) / जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) / विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) या समित्यांची सभा घेण्यात आली. त्या सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव व कार्यालय | हुद्दा | ✓ उपस्थित X अनुपस्थित | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) | जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) | विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) |
| 1 | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग. | अध्यक्ष | ✓ | ✓ | ✓ |
| 2 | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग | सदस्य | X | X | X |
| 3 | पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग (प्रतिनीधी) | सदस्य | ✓ | ---- | --- |
| 4 | निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | सदस्य सचिव | ✓ | ✓ | ✓ |
| 5 | उप वनसंरक्षक, वन विभाग सावंतवाडी. | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| 6 | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य | X | X | X |
| 7 | नगर रचनाकार सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | ✓ | -- |
| 8 | सहा. मत्स्यव्यवसाय आयुक्त, सिंधुदुर्ग मालवण (प्रतिनीधी) | सदस्य | X | -- | X |
| 9 | डॉ.बबन इंगोले, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |
| 10 | डॉ.पी.वेठमणी, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मा.विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई. | सदस्य | X | -- | -- |
| 12 | उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी | सदस्य | ✓ | --- | --- |
| 13 | उपविभागीय अधिकारी, कणकवली | सदस्य | ✓ | --- | --- |
| 14 | उपविभागीय अधिकारी, कुडाळ | सदस्य | ✓ | --- | --- |
| 15 | मुख्याधिकारी, नगर परिषद, वेंगुर्ला (प्रतिनिधी) | सदस्य | ✓ | --- | --- |
| 16 | मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण (प्रतिनिधी) | सदस्य | ✓ | --- | --- |
| 17 | मुख्याधिकारी, नगर पंचायत, जामसंडे-देवगड | सदस्य | ✓ | --- | --- |
| 18 | जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, सिंधुदुर्ग. प्रतिनीधी | सदस्य | ✓ | --- | --- |
| 19 | प्रादेशिक बंदर अधिकारी, वेंगुर्ला कार्यालय | सदस्य | -- | -- | ✓ |
| 20 | कृष्णनाथ भ. तांडेल. रा.सर्जेकोट मिर्याबांदा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| 21 | वसंत महादेव तांडेल. मु.पो.नवाबाग,ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| 22 | संजय प्रभाकर बांदेकर. मु.पो.आनंदवाडी देवगड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| 23 | घनःश्याम उर्फ निलेश विनायक सामंत. मु.पो.परुळे, (मांजरडेवाडी), ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| 24 | मेघनाद गणपत धुरी. रा.दांडी मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 25 | वैशाली विजय आरोंदेकर. मु.पो.आरोंदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| 26 | ज्ञानेश्वर सुर्यकांत खवळे. मु.पो.तारामुंबरी,ता.देवगड,जि .सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| 29 | तहसिलदार सावंतवाडी | नोडल ऑफिसर | X | X | X |
| 30 | प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विभाग, सिंधुदुर्ग | | X | X | X |
| 31 | गटविकास अधिकारी मालवण | | ✓ | ✓ | ✓ |
| 32 | गटविकास अधिकारी वेंगुर्ला | | X | X | X |
| 33 | गटविकास अधिकारी देवगड | | ✓ | ✓ | ✓ |
| 34 | नायब तहसिलदार (महसूल) | | ✓ | ✓ | ✓ |

प्रथम उपस्थितांचे स्वागत करुन सर्व सदस्य अधिकारी / कर्मचारी यांची ओळख करुन घेणेत आली. उपस्थित अधिकारी/सदस्य यांचा आढावा घेतला असता, वरीलप्रमाणे अधिकारी/ सदस्य उपस्थित होते. जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) / जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) / विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) या समित्यांतील समितीनिहाय वाचन करण्यात आले.

सिंधुदुर्ग जिल्हयातील समुद्रकिनारी असलेले तालुके वेंगुर्ला, मालवण व देवगड असे आहेत. त्यामुळे संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी व नगर पंचायत /परिषद चे मुख्याधिकारी हे सदर समितीमध्ये सदस्य आहेत.

MCZMA यांचेकडून सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण ४५ तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी उपविभागीय अधिकारी अधिकारी, सावंतवाडी यांचे उपविभागातील एकूण २४ तक्रारी अर्ज आहेत. त्यापैकी ११ अर्ज निकाली झालेले आहे. त्याबाबतचा अहवाल MCZMA कडे पाठविण्यात आलेला आहे. उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचेकडे १७ तक्रारी अर्ज प्राप्त आहेत. त्यापैकी ७ अर्ज निकाली झालेले आहेत. उपविभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडे एकूण ४ अर्ज प्राप्त असून त्यापैकी ३ अर्ज निकाली झालेले आहे.

## उपविभागीय अधिकारी निहाय तक्रारींचा गोषवारा

| अ.क्र. | उपविभाग | प्राप्त तक्रारी | निकाली तक्रारी | शिल्लक तक्रारी |
|---|---|---|---|---|
| १ | कणकवली | ४ | ३ | १ |
| २ | कुडाळ | १७ | ७ | १० |
| ३ | सावंतवाडी | २४ | ११ | १३ |
| | **एकूण** | **४५** | **२१** | **२४** |

## निकाली प्रकरणी विगतवारी

| | |
|---|---|
| **१) गुन्हा दाखल झालेली प्रकरणे** | **०२** |
| **२) अनधिकृत बांधकाम प्रकरणी** | **०३** |
| **३) न्याय प्रविष्ठ असलेली प्रकरणे** | **०२** |
| **४) CRZ उल्लंघन न झालेली प्रकरणे** | **०६** |
| **५) इतर जिल्हयातील प्रकरणे** | **०१** |
| **६) अनधिकृत उत्खनन (खनिकर्म)** | **०७** |
| **एकूण** | **२१** |

**वरीलप्रमाणे प्रलंबित तक्रारीचे वाचन करण्यातआले.**

**श्री.प्रदीप धावडे तक्रार क्र.२ व ५ -** यांचे अर्जप्रकरण या कार्यालयास प्राप्त झालेले नव्हते. सदरचे अर्ज प्राप्त करुन घेणेत आलेले आहे. सदरचे अर्ज उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे. सदरची तक्रार तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडून मंडळ अधिकारी यांचेकडे चौकशीसाठी पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले. उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी याबाबत माहिती दिली. त्यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी सदरचा अर्ज दिनांक ०५/०७/२०२४ रोजी पाठविल्याचे दिसते त्यानंतर त्यावर काय कार्यवाही झाली याबाबतचा आढावा घेऊन तात्काळ कार्यवाही करणेच्या सूचना देणेत आल्या.

**श्री.महेश वेंगुर्लेकर, तक्रार क्र.७ -** सदर अर्ज प्रकरणी तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडून सन २०२० मध्ये अहवाल सादर केल्याचे संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी सांगितले. मा. अध्यक्ष महोदय यांनी सदर अहवाल २०२० मध्ये सादर केलेला असल्याने नव्याने अद्यावत अहवाल सादर करावा. त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल, असे सांगण्यात आले.

**श्री.विश्वजित चिंदरकर, तक्रार अर्ज क्र.९, १३ व १५ –** सदर अर्जाबाबत निकाली करण्याबाबत अहवाल सादर करण्यात आलेला होता. तथापि सदरचे अहवाल Standard Operating Procedure

for Addressing CRZ Violations नुसार सादर करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे सदर प्रकरणी SOP नुसार तात्काळ अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी कुडाळ यांना कळविणेत आलेले आहे. याबाबत नगरपंचायत मालवण यांचे प्रतिनिधी यांना विचारणेत आले. एकाच व्यक्तीचे तीन अर्ज आहेत. नगरपंचायत मालवण यांनी अहवाल तयार केलेला आहे, सदरचा अहवाल तात्काळ सादर करणेत येईल असे सांगितले.

**श्री.एस.पी.चहांदे, तक्रार अर्ज क्र.११**– सदरचा अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. याबाबत या कार्यालयाकडून अर्ज प्राप्त करुन घेणेसाठी काय कार्यवाही केली, याबाबत टिपणीमध्ये नमुद करण्याच्या सूचना देणेत आल्या.

**श्री.आनंद हुले, तक्रार अर्ज क्र.१८** – सदर अर्जाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कुडाळ यांनी सांगितले की, जमीन ज्यांच्या ताब्यात आहे, त्यांनी अतिक्रमण दूर करावे. सदर प्रकरणी नोटीसा देणेत आलेल्या होत्या. अनधिकृत बांधकाम काढणेबाबत बंदर विभाग / नगरपंचायत यापैकी कोणी कार्यवाही करावी, याबाबत चर्चा करण्यात आली. सदर प्रकरणी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन होत आहे अगर कसे याबाबत सहायक संचालक, नगर रचना सिंधुदुर्ग व मालवण नगरपरिषद यांनी पाहणी करण्यात यावी.

**श्री.महेश वेंगुर्लेकर, तक्रार अर्ज क्र.१९** – सदर अर्जाबाबत अहवाल सन २०२० मध्ये सादर केला असल्याचे उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी सांगितले. सदरच्या अर्जाबाबत अद्यावत अहवाल तयार करुन सादर करावा. जेणेकरुन काय वस्तुस्थिती आह हे समजून येईल. त्यानंतर सदर तक्रार अर्ज निकाली करण्याबाबत निर्णय घेणेत येईल.

**श्री.मिनानाथ पराडकर, तक्रार अर्ज क्र.२०** – खाजगी जमिनीवर बांधकाम असल्याचे सांगण्यात आले. सदर प्रकरणी सीआरझेड कायद्याचे उल्लघंन होते अगर कसे याबाबत खात्री करावी. तसेच सदरचे बांधकाम करण्यासठी परवानगी कोणी दिली याची खात्री करावी. तसेच जुन्या बांधकामाबाबत पुरावे घ्यावे. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.आनंद हुले, तक्रार अर्ज क्र.२१** – सदर अर्जाबाबत उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी माहिती दिली. सदर प्रकरणी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन होत आहे अगर कसे याबाबत सहायक संचालक, नगर रचना सिंधुदुर्ग व नगरपरिषद मालवण यांचेकडून अहवाल घेऊन पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल असे उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी सांगितले.

**तक्रार अर्ज क्र.२२** – याबाबत उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी माहिती दिली. सदर प्रकरणी मंडळ अधिकारी मालवण यांचेमार्फत स्थळपाहणी करुन तहसिलदार मालवण यांनी अहवाल सादर केलेला आहे. तक्रारी अर्जामधील जमिनीलगत कोणत्याही प्रकारचे बांधकाम केलेले दिसून आलेले नाही. स्थळपाहणी वेळी तक्रारदार श्रीम.ज्योती माडये यांनी सदरचे ठिकाणी कोणतेही बांधकाम नसल्याने आपला तक्रार अर्ज निकाली ठेवणेबाबत जबाब लिहून दिलेला आहे. सदर प्रकरणी अहवाल प्राप्त झालेला आहे. परिणामी सदरचा अर्ज निकाली ठेवणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.उदय तांडेल, तक्रार अर्ज क्र.२३** – याबाबत उपविभागीय अधिकारी, कणकवली यांनी माहिती दिली. बांधकाम परवानगी देणेचे अधिकार ग्रामपंचायतीस आहे. त्याचबरोबर अनधिकृत बांधकाम होत असल्यास ते काढण्याची पण जबाबदारी ग्रामपंचायत यांची आहे. याबाबत गटविकास अधिकारी देवगड यांना माहिती विचारणा केली असता, सदर प्रकरणी कार्यवाही करण्यास विलंब होत असल्याचे दिसून आल्याने मा. अध्यक्ष महोदय यांनी सदर अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

**श्री.क्रिष्णा मराठे, तक्रार अर्ज क्र.२५** – सदर अर्ज प्रकरण या कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही. सबब सदर अर्जाची प्रत मिळणेसाठी या कार्यालयाकडील पत्र क्र.डेस्क-८/मशा-२/सीआरझेड/तक्रारी अर्ज/२०२४/ ६४८४ दिनांक १४/०६/२०२४ व स्मरणपत्र दिनांक ०२/०७/२०२४ व दिनांक १९/०८/२०२४ अन्वये MCZMA यांचेकडे अर्ज मिळणेकामी विनंती केलेली आहे.

**श्री.महेश वेंगुर्लेकर, तक्रार अर्ज क्र.२८** – तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडून दिनांक ०९/०७/२०२४ रोजी मंडळ अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले. सबब अर्ज पाठवून दोन महिने झाले आहे. प्रकरणी तात्काळ अहवाल मागवून कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.रमेश चव्हाण, तक्रार अर्ज क्र. ३०** - याबाबत उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी तक्रारीत नमुद अर्जदार गावात राहत नसल्याचे सांगितले. तरीही अर्जामध्ये नमुद केलेल्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम झाले आहे का याची खात्री करावी, तसेच अर्जदार यांचे नांवे जमीन आहे काय ? त्यावरुन अनधिकृत बांधकाम कोठे झाले हे तपासावे. अशा सूचना मा. अध्यक्ष महोदय यांनी दिल्या. जर बांधकाम झाले नसल्यास तसा अहवाल सादर करावा.

**श्री.अमृत नार्वेकर, तक्रार अर्ज क्र.३१** – सदर तक्रारी अर्जाबाबत सदरचा विषय कोर्टात प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले. सदर प्रकरणी पाहणी केली असल्याचे उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी सांगितले. सदर ठिकाणी मांगर व संडास कर्लीखाडी किना-यालगत बांधकाम केले आहे. सदर ठिकाणी मंडळ अधिकारी, आंबेरी यांचेमार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता, सदर ठिकाणी होडयांना

लागणारी सर्व लोखंडी कामे, केबीन, ढोलकाडी आडी, बिम लोखंडी ग्रील्स इ. कामे केली जातात. परंतु होडया तयार करणे तसेच केमिकल व फायबरच्या होडयासाठी वापर करणे इ.कामे करत नसल्याचे सांगण्यात आले. सदर प्रकरणी दावा न्यायप्रविष्ठ असल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये असा जबाब श्री.उल्हास नारायण नार्वेकर यांनी दिलेला आहे. सबब सदर तक्रारी अर्ज निकाली झाल्याबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी सादर केलेला आहे.

**श्री.दयानंद क्रिष्णाजी, अर्ज क्र.३४** – सदर तक्रारी अर्जाबाबत तहसिलदार वेंगुर्ला यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून, श्रीम. ज्योती कृष्णाजी यांनी आपले जुने मातीचे घर पाडून त्याच जागेवर नवीन बांधकाम केलेले आहे. सदर प्रकरणी सविस्तर चौकशी करुन जुन्या एवढयाच क्षेत्रावर बांधकाम केले अगर कसे याबाबतचे पाहणी करुन अहवाल सादर करावा, अशा सूचना मा. अध्यक्ष महोदय यांनी दिल्या.

**श्रीराम ग्रामस्थ, अर्ज क्र.३६** – सदर तक्रारी अर्ज तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडून मंडळ अधिकारी म्हापण यांजकडे चौकशीसाठी दिनांक १२/०९/२०२३ रोजी पाठविण्यात आल्याचे अहवालावरुन दिसून येते. सदर अर्ज पाठवून बराच कालावधी झालेला असल्याने तात्काळ कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देणेत आल्या.

**श्री.आनंद हुले, तक्रार अर्ज क्र.३७** – सदरचा अर्ज मालवण नगरपरिषद क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबतचा आहे. अर्जदार श्री.आनंद हुले यांचे तीनही अर्जाबाबत तात्काळ कार्यवाही करुन अहवाल सादर करावा अशा सूचना देणेत आल्या.

**श्री.संजय खराडे, तक्रार अर्ज क्र.३८** – अर्जदार यांनी बांधकाम परवानगीबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद मालवण यांचे विरुध्द मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांजकडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४७ खालील अपील दाखल आहे. सदरची बाब न्यायप्रविष्ट असल्याने सदरचे प्रकरण निकाली करता येईल, असे मुख्याधिकारी, नगरपरिषद मालवण यांनी सांगितले. सदर प्रकरणी नगरपरिषद मालवण यांनी पुर्नबांधकाम परवानगी नाकारलेली असल्याचे सांगण्यात आले. बांधकाम परवानगी कधी मागितली आहे याबाबतची सविस्तर माहिती घ्यावी व अहवाल सादर करावा, अशा सूचना संबंधिताना देण्यात आल्या.

**डॉ.नितीन द्वा. सारग, तक्रार अर्ज क्र.४०** – सदर तक्रारी अर्जाबाबत अहवाल प्रलंबित आहे. सदरचा अर्ज चौकशी व कार्यवाहीसाठी तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडे पाठविण्यात आल्याचे उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांनी सांगितले. सदरचा कांदळवनाबाबतचा असल्याने उपवनसंरक्षक, वन

विभाग सावंतवाडी यांचेशी चर्चा करणेत आली. अहवाल सादर करण्याच्या सूचना देणेत आल्या. सदर प्रकरणी खारभूमी विभागाचाही अहवाल घेण्यात यावा अशाही सूचना देणेत आल्या.

**ग्रामपंचायत परुळेबाजार, तक्रार अर्ज क्र.४०** – सदरचा तक्रार अर्ज नविन प्राप्त झालेला आहे. सदर तक्रारी अर्जाबाबत अहवाल प्रलंबित आहे. सदरचा अर्ज चौकशी व कार्यवाहीसाठी तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडे पाठविण्यात आल्याचे उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांनी सांगितले. सदरचा अर्ज कांदळवनाबाबतचा असल्याने उपवनसंरक्षक, वन विभाग सावंतवाडी यांचेशी चर्चा करणेत आली. अहवाल सादर करण्याच्या सूचना देणेत आल्या.

सदर बैठकीस गैरहजर असलेल्या सदस्यांना नोटीस काढण्याच्या सूचना देणेत आल्या. पुढील बैठकीच्या वेळी प्रलंबित अर्ज सोबत ठेवण्यात यावेत. म्हणजे सदरच्या अर्जामध्ये नमुद तक्रार सविस्तररित्या समजणे शक्य होईल. अशा सूचना मा.अध्यक्ष महोदय यांनी दिल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

क्र.डेस्क-८/मशा-२/सीआरझेड सभा/९/२०२४,
जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, दिनांक :- २३/०९/२०२४

(अनिल पाटील)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सागरी किनारा क्षेत्र
संनियंत्रण समिती (DCZMC) तथा
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

प्रत :-
1) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी तथा सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
2) मा.सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
3) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
4) सर्व संबंधित सदस्य यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
5) तहसिलदार देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला

# इतिवृत्त

मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली माहे डिसेंबर २०२४ या महाची जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) / जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) / विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) या समित्यांची सभा दिनांक १३/१२/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात आली. त्या सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव व कार्यालय | हुद्दा | ✓ उपस्थित X अनुपस्थित | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हास्तरीय सागरी क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) | जिल्हास्तरीय टास्क फोर्स (DTF) | विशिष्ट क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (ASMP) |
| 1 | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग. | अध्यक्ष | ✓ | ✓ | ✓ |
| 2 | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग (प्रभारी) | सदस्य | ✓ | ✓ | ✓ |
| 3 | पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग (प्रतिनीधी) | सदस्य | ✓ | ---- | --- |
| 4 | निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | सदस्य सचिव | ✓ | ✓ | ✓ |
| 5 | उप वनसंरक्षक, वन विभाग सावंतवाडी. | सदस्य | X | X | X |
| 6 | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य | X | X | X |
| 7 | नगर रचनाकार सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | ✓ | -- |
| 8 | सहा. मत्स्यव्यवसाय आयुक्त, सिंधुदुर्ग मालवण (प्रतिनीधी) | सदस्य | X | -- | X |
| 9 | डॉ.बबन इंगोले, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |
| 10 | डॉ.पी.वेठमणी, शास्त्रज्ञ डोना पावला गोवा. | सदस्य | X | -- | X |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मा.विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई. | सदस्य | X | -- | -- |
| 12 | उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी | सदस्य | ✓ | --- | --- |
| 13 | उपविभागीय अधिकारी, कणकवली | सदस्य | ✓ | --- | --- |
| 14 | उपविभागीय अधिकारी, कुडाळ | सदस्य | ✓ | --- | --- |
| 15 | मुख्याधिकारी, नगर परिषद, वेंगुर्ला | सदस्य | ✓ | --- | --- |
| 16 | मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण (प्रतिनिधी) | सदस्य | ✓ | --- | --- |
| 17 | मुख्याधिकारी, नगर पंचायत, जामसंडे-देवगड | सदस्य | ✓ | --- | --- |
| 18 | जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, सिंधुदुर्ग. प्रतिनीधी | सदस्य | ✓ | --- | --- |
| 19 | प्रादेशिक बंदर अधिकारी, वेंगुर्ला कार्यालय | सदस्य | -- | -- | ✓ |
| 20 | कृष्णनाथ भ. तांडेल. रा.सर्जेकोट मिर्याबांदा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | X | -- | -- |
| 21 | वसंत महादेव तांडेल. मु.पो.नवाबाग,ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | -- | -- |
| 22 | संजय प्रभाकर बांदेकर. मु.पो.आनंदवाडी देवगड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | ✓ | -- | -- |
| 23 | घनःश्याम उर्फ निलेश विनायक सामंत. मु.पो.परुळे, (मांजरडेवाडी), ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | ✓ | -- |
| 24 | मेघनाद गणपत धुरी. रा.दांडी मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |

--

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 25 | वैशाली विजय आरोंदेकर. मु.पो.आरोंदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| 26 | ज्ञानेश्वर सुर्यकांत खवळे. मु.पो.तारामुंबरी,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग. | सदस्य | -- | X | -- |
| 29 | तहसिलदार सावंतवाडी | नोडल ऑफिसर | ✓ | ✓ | ✓ |
| 30 | प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विभाग, सिंधुदुर्ग | | X | X | X |
| 31 | गटविकास अधिकारी मालवण | | X | X | X |
| 32 | गटविकास अधिकारी वेंगुर्ला | | ✓ | ✓ | ✓ |
| 33 | गटविकास अधिकारी देवगड | | ✓ | ✓ | ✓ |
| 34 | तहसिलदार (महसूल) | | ✓ | ✓ | ✓ |

प्रथम सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सर्व सदस्य अधिकारी / कर्मचारी यांची ओळख करुन घेणेत आली.

मा.निवासी उपजिल्हाधिकारी यांनी MCZMA यांचेकडून सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण ४७ तक्रारी अर्ज प्राप्त झाले असल्याबाबत सांगण्यात आलेले. त्यापैकी २४ निकाली व शिल्लक २३ अर्ज राहिलेले आहे. सदर २३ अर्जाचा आढावा घेणेचा असल्याचे सांगण्यात आले.

उपविभाग निकाय तक्रारीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**<u>उपविभागीय अधिकारी निहाय तक्रारींचा गोषवारा</u>**

| अ.क्र. | उपविभाग | प्राप्त तक्रारी | निकाली तक्रारी | शिल्लक तक्रारी |
|---|---|---|---|---|
| १ | कणकवली | ०४ | ०३ | ०१ |
| २ | कुडाळ | १७ | १० | ०७ |
| ३ | सावंतवाडी | २४ | ११ | १३ |
| | **एकूण** | **४५** | **२४** | **२१** |

## निकाली प्रकरणी विगतवारी

| | | |
|---|---|---|
| १) | गुन्हा दाखल झालेली प्रकरणे | ०२ |
| २) | अनधिकृत बांधकाम प्रकरणी | ०३ |
| ३) | न्याय प्रविष्ठ असलेली प्रकरणे | ०४ |
| ४) | CRZ उल्लंघन न झालेली प्रकरणे | ०७ |
| ५) | इतर जिल्हयातील प्रकरणे | ०१ |
| ६) | अनधिकृत उत्खनन (खनिकर्म) | ०७ |
| | एकूण | २४ |

**एकूण २३ तक्रारी प्रलंबित असून त्याचा तक्रारीनिहाय खालीलप्रमाणे आढावा घेणेत आला.**

**उपविभागीय अधिकारी कणकवली यांचेकडील तक्रार अर्ज क्र. २३ ही एकच तक्रार प्रलंबित असल्याने सर्वप्रथम माहिती घेण्यात आली.**

श्री.उदय तांडेल यांचे अर्जाबाबत उपविभागीय अधिकारी कणकवली यांनी माहिती दिली. सदर तक्रारीबाबत श्री.संजय प्रभाकर बांदेकर अशासकीय सदस्य यांनी थोडक्यात माहिती दिली. तक्रारदार यांचे तक्रारीमध्ये नमुद केलेली जागा ही खेकडा पालनसाठी शेड बांधून केले आहे. खांब उभे करुन पत्र्याची शेड तयार केली आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी तक्रारदार यांची तक्रार काय आहे. जागेवरील वस्तूस्थिती काय आहे याची पडताळणी करावी. त्यानंतर कार्यवाही करणे सोईचे होईल असे सांगण्यात आले.

**श्री.विश्वजित चिंदरकर, तक्रार अर्ज क्र.९, १३ व १५ –** सदर तक्रारी अर्जाबाबत चर्चा करणेत आली. सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, नगरपंचायत मालवण यांचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली. सदर अर्जातील मूळ तक्रार काय आहे याबाबत विचारणा करणेत आली. नगरपंचायत यांचे हद्दीमध्ये बांधकाम होताना का थांबवत नाही. त्याच वेळेस कार्यवाही करणे आवश्यक असते, परंतु असे होत नाही. त्यामुळे तक्रारी वाढत जातात. तरी सदर प्रकरणी तक्रारदार यांचे अर्जामधील तक्रार व जागेवरील वस्तूस्थिती याची पडताळणी करावी असे मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी सांगितले.

अशासकीय सदस्य श्री.बांदेकर यांनी अनधिकृत बांधकाम असलेतरी कर वसूलीसाठी घर नंबर देण्यात येतात असा मुद्दा उपस्थित केला. याबाबत मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी अनधिकृत बांधकामधारक यांचेकडून कर वसुली केल्यास बांधकाम नियमानूकुल होते हा समज चुकीचा असून सदर प्रकरणी बांधकामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणेत यावी. तक्रार प्राप्त जागेवर मूळ बांधकाम होते अगर कसे, का नव्याने बांधकाम करण्यात आले आहे, याची शहानिशा संबंधित यंत्रणेकडूनकरणेत यावी, अशा सूचना देणेत आल्या.

सदर प्रकरणी तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने मुध्याधिकारी यांचे प्रतिनिधी यांना माहिती व्यवस्थित देता आलेली नाही. सबब मुख्याधिकारी नगरपंचायत मालवण यांना नोटीस काढून अनुपस्थितीबाबत खुलासा घेणेत यावा असे सुचित केले.

**<u>श्री.आनंद हुले, तक्रार अर्ज क्र.१८, २१ व ३७</u>** – सदर अर्जाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कुडाळ यांनी माहिती दिली. अर्जदार यांचा अ.क्र.२१ चा अर्ज स्कूबा डायविंगमुळे कोरल, कोरल लिव्ह यांचा -हास होत असल्याचा आहे. तसेच अ.क्र.१८ व ३७ हे अनधिकृत बांधकामाबाबतचे आहे. सदरचे बांधकाम हे नगरपंचायत हद्दीतील नसल्याचे सबब देत नगरपंचायत कारवाई करीत नसल्याचे उपविभागीय अधिकारी कुडाळ यांनी सांगितले. मुख्याधिकारी, मालवण नगरपरीषद व प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड हे दोघेही अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याचे टाळत असल्याचे सांगण्यात आले. याबाबत मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी सदरची जमीन कोणाची आहे, मालक कोण आहे हे न बघता अनधिकृत बांधकाम झाले असल्याने नगरपरिषद मालवण यांनी कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या.

**<u>श्री.महेश वेंगुर्लेकर, तक्रार अर्ज क्र.७, १९ व २८</u>** – सदर अर्जाबाबत उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी माहिती दिली. श्री.महेश वेंगुर्लेकर यांचे ३ अर्ज असून दोन अर्ज खारभूमी विभागाकडे प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले. तसेच एक अर्ज अनधिकृत बांधकामाबाबतचा आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून तात्काळ अहवाल घेण्याच्या सूचना देणेत आल्या. तसेच अशा संवेदनशील विषयाचा मंडळ अधिकारी यांचेकडून अहवाल मिळणे शक्य असताना त्याबाबत उशिर का होतो, अशी विचारणा उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांना करणेत आली. यावर उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांचेकडून तहसिलदार / गटविकास अधिकारी/ मुख्याधिकारी, न.प. यांचे समवेत सदर प्रकरणांबाबत एक बैठक घेऊन कार्यवाही करण्यात येईल असे सांगण्यात आले.

**<u>श्री.उदय तांडेल, तक्रार अर्ज क्र.२३</u>** – सदर प्रकरणी गटविकास अधिकारी देवगड यांनी माहिती दिली. कणकवली उपविभागातील एकच प्रकरण शिल्लक राहिलेले आहे. तरी सदर प्रकरणी तात्काळ

आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदरची तक्रारी ही अनधिकृत बांधकामाबाबतची आहे. सदर जागेमध्ये खेकडा पालन प्रकल्प चालवित असल्याचे सांगण्यात आले. सदर प्रकरणी पक्के बांधकाम झाले अगर कसे याची पहाणी करणेत यावी व तसा अहवाल अहवाल देणेत यावा, अशा सूचना संबंधिताना मा.जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून देण्यात आल्या.

**तक्रार अर्ज क्र.११ व २५** – सदर अर्ज प्रकरण या कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही. सबब सदर अर्जाची प्रत मिळणेसाठी या कार्यालयाकडील पत्र क्र.डेस्क-८/मशा-२/सीआरझेड/तक्रारी अर्ज/२०२४/ ६४८४ दिनांक १४/०६/२०२४ व स्मरणपत्र दिनांक ०२/०७/२०२४, १२/०७/२०२४, दिनांक २०/०८/२०२४, दिनांक ०२/०९/२०२४ व दिनांक २८/११/२०२४ अन्वये मा.MCZMA यांचेकडे अर्ज मिळणेकामी विनंती केलेली असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सांगितले.

**श्री.रमेश चव्हाण, तक्रार अर्ज क्र. ३० -** याबाबत उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांनी तक्रारीत नमुद अर्जदार गावात राहत नसल्याचे सांगितले. त्यावर मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम झाले आहे का याची खात्री करावी, तसेच अर्जदार यांचे नांवे जमीन आहे काय ? त्यावरुन अनधिकृत बांधकाम कोठे झाले हे तपासावे. अशा सूचना मागिल बैठकीमध्ये देणेत आलेल्या होत्या. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. तरी या प्रकरणात तात्काळ कार्यवाही करावी अशा सूचना देणेत आल्या.

**अर्ज क्र. ३४, ३६, ४०, ४४, ४५, ४६** – सदर तक्रारी अर्ज उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांचेकडील प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले. सदर प्रलंबित तक्रारीबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना देणेत आल्या.

**श्री.संजय खराडे, तक्रार अर्ज क्र.३८** – सदर प्रकरणी मुख्याधिकारी मालवण नगर परीषद यांनी अहवाल सादर केलेला आहे. मालवण नगरपरींष्द हद्दीतील गवंडीवाडा भागातील स.नं.८४३ (७६८M) हि.नं. १/१ मधील जमीनधारक श्री. संजय लाडोबा खराडे यांनी दिनांक २९.०४.२०१९ रोजी दाखल केलेला बांधकाम परवानगी प्रस्ताव तांत्रीक कारणास्तव दिनांक १४.०७.२०२४ रोजी नगर परीषद मालवण कार्यालयाकडून नाकारण्यात आलेला असून, याबाबत अर्जदार यांनी शासनाकडे अपील दाखल केलेला आहे. सदर अपील प्रकरणी मालवण नगर परीषद कार्यालयाकडून शासनास अहवाल सादर केलेले असून, सदर प्रकरणी निर्णय प्रलंबित आहे.

दरम्यान महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अ‍ॅथॉरिटी (MCZMA) कडील पत्र Complaint 2023/CR-135/TCG, दिनांक २२.११.२०२३ नुसार मंजूर कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लान (CZMP) 2023 नुसार सदरचे क्षेत्र ५० मीटर क्षेत्राबाहेर असल्याने CRZ अधिसूचना २०१९ च्या तरतुदी लागू होत

नाहीत असे कळविलेले आहे. ( सोबत प्रत आहे) त्यामुळे सदर प्रकरण CRZ तक्रारी यादीमधून वगळणेबाबत मालवण नगर परीषद कार्यालयाकडून उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांचेमार्फत अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदरचा अहवाल तक्रार यादीमधून वगळणेसाठी मा.MCZMA यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे.

अशासकीय सदस्य श्री.बांदेकर यांनी तांबळडेग ग्रामपंचायत हद्दीच्या आत समुद्रापासून १०० मीटर अंतरावर बांधकाम झाल्याचे दिसून आल्याचे सांगितले. तसेच कातवण ग्रामपंचायत हद्दीमध्ये सुध्दा अशाप्रकारचे बांधकाम झाल्याचे दिसून आलेले आहे असे सांगितले. याबाबत मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी गटविकास अधिकारी देवगड यांना सदर ठिकाणी पाहणी करुन कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना दिल्या.

श्री.निलेश सामंत, अशासकीय सदस्य यांनी सीआरझेड क्षेत्राचे नकाशे तयार करण्याचे काम चेन्नईच्या संस्थेला दिले असल्याचे समजते. सदरचे नकाशे पूर्ण झाले आहे काय याबाबत विचारणा केली. याबाबत सहायक संचालक, नगर रचना सिंधुदुर्ग व जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, सिंधुदुर्ग यांना खात्री करण्याच्या सूचना देणेत आल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

क्र.डेस्क-८/मशा-२/सीआरझेड सभा/१२/२०२४,
जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, दिनांक :- १३/१२/२०२४

(अनिल पाटील)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सागरी किनारा क्षेत्र संनियंत्रण समिती (DCZMC) तथा
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

प्रत :- १) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी तथा सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
४) सर्व संबंधित सदस्य यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) तहसिलदार देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला